

# संजीवनी वटी - बहुपयोगी कल्प



वैद्य मदन टोंगे

संजीवटी वटी हा औषधी योग शारंगधर संहितेत आला असून या योगात आयुर्वेदात वापरात असलेली द्रव्ये आली आहेत. १. विडंग २. शुंठी ३. पिंपळी ४. हरीतकी ५. आमलकी ६. बिभितकी ७. वचा ८. गुडुची ९. भल्लातक १०. वत्सनाभ. वरील द्रव्यांना गोमूत्राने भावित करून वटी तयार केली जाते.

संजीवनी वटी रामायणात प्रसिध्द असून हनुमंताने लक्ष्मणासाठी ही हिमालयातून आणली व लक्ष्मणाचे प्राण वाचवले. नवचैतन्य देणारी, जीवन देणारी ती संजीवनी. कदाचित अशा प्रकारचे कर्माचे महत्व जाणूनच शारंगधराने या कल्पाचे नाव संजीवनी ठेवले असावे असे मला वाटते. यातील ही दहा द्रव्ये आयुर्वेदातील अतिशय महत्वाची व स्वतंत्ररित्या चिकित्सेतील अतिशय महत्वाची व उपयुक्त द्रव्य आहेत. अशी ही Top Ten द्रव्ये एकत्र येण्याने त्यांचा एकत्रित संयोग प्रभाव व synergistic action effect हा या कल्पाला अतिशय प्रभावी (highly potent) बनवतो. या कल्पातील प्राधान्याने पाचन करणारी उष्ण, तीक्ष्ण, व्यवायी गुणाची, सूक्ष्म स्रोतसात प्रवेश करू शकणारी शुंठी, पिंपळी, भल्लातक, वचा, विडंग आदी द्रव्ये व गोमूत्राची भावना ही या कल्पाला अतिशय वीर्यवान बनवते. वाढलेल्या दोषांचे, आमाचे पाचन करण्यास उपयुक्त बनवते. त्यामुळे हा कल्प सान्निपातिक अवस्थेत व विषचिकित्सेत ही उपयुक्त ठरतो. ही सर्व द्रव्ये (bioavailability) वाढवणारीच आहेत. त्यामुळे कल्पाची काम करण्याची क्षमता पटीत वाढते.

संजीवनीतील हरीतकी, बिभितकी व आमलकी ही तीन द्रव्ये जी त्रिफळा नावाने परिचित आहेत हे त्रिदोषहर आहेत (सन्निपातहर) उर्वरित सात द्रव्ये ही कफ-वात शामक आहेत. शुंठी व गुडुची पित्तशामक आहेत व कफवात शामक आहे. त्यामुळेच संजीवनी वटी हा सन्निपातहर व कफवातशामक कार्य करणारा कल्प ठरतो.

संजीवनी वटी हा कल्प ज्वरघ्न कार्य करतो. यातील शुंठी हे द्रव्य उत्कृष्ट आमपाचक करणारे आहे यातील बाकी द्रव्ये ही हरीतकी, विडंग, वचा, गुडुची ही आमपाचन करून अग्निला बल देणारी आहेत.

वत्सनाभ हे उत्कृष्ट ज्वरनाशक द्रव्य, आमपाचन करतो व स्वेदवह स्रोतसातील अवरोध दूर करून ज्वर कमी करतो.

पिंपळी, वचा, शुंठी, भल्लातक - हे त्यांच्या कटु रस व उष्ण गुणामुळे स्वेदवह स्रोतसातील अवरोध दूर करतात.

अशा प्रकारे - ❊ रसपाचन ❊ आमपाचन ❊ स्वेदजनन

अशी कर्मे करणारी द्रव्ये असल्याने कल्प सन्निपातज ज्वर विशेषतः कफवातज ज्वरात उपयुक्त ठरतो.

यातील द्रव्ये आमपाचन करून अजीर्ण दूर करतो. त्यामुळे हा कल्प विसूचिकेत, प्रवाहिका, अतिसारात उपयुक्त ठरतो.

संजीवनी वटी गुल्म चिकित्सेत प्रभावी औषध आहे. यातील द्रव्ये आमपाचन करून स्रोतोरोध दूर करतात व वाताचे अनुलोमन कार्य होते व गुल्म व्याधीत उपशय होतो. या कल्पातील सर्वच द्रव्य ही शोथहर, शूलहर, आध्मानहर, वेदनास्थापक कार्य करणारी आहेत.

यातील वत्सनाभ व भल्लातक हे स्थावर विष असून ते सर्प विषास (जांगम विष) व इतर जांगम विषास antitote विरोधी कार्य करीत असावे म्हणून उल्लेख आला असावा. गोमूत्र हे दीपन, पाचन, विषहर, कृमिघ्न कार्य करणारे आहे.

**संजीवनी वटीचे उपयोग** - ❊ प्रतिश्याय, कास, श्वास allergic प्रतिश्याय ❊ ज्वर, Viral fever, Typhoid नासास्राव ❊ कफवातशामक ❊ अतिसार, अजीर्ण, प्रवाहिका ❊ कृमी ❊ पाचक शक्ती वाढवते, अग्निमांद्यात उपयुक्त ❊ संधीशूल, आमवात, संधिशोथ ❊ सर्पविष ❊ अंगमर्द, आध्मान, भोजनोत्तर सुस्ती, निद्रा, अंगगौरव यात उपयुक्त. ❊ विद्यार्थ्यांमध्ये विशेषतः कफ वा तमाच्या आवरणाने लिप्त बुध्दिमांद्यात मेध्य म्हणून काम करते. यातील अनेक घटक द्रव्य मेध्य म्हणून काम करतात.

**मात्रा (Dose)** - एकमेव औषध जे वेगवेगळ्या व्याधी अवस्थांमध्ये वेगवेगळ्या मात्रेत द्यावयास सांगितले आहे.

❊ अजीर्ण व गुल्मात - एक वटी ❊ अतिसार, प्रवाहिका, विसूचिका - दोन वटी ❊ सर्प विषावर - तीन वटी ❊ सान्निपातिक दोषांच्या अवस्थेत - सान्निपातिक ज्वर

**रसादिंचा सूक्ष्म विचार हा कल्पाची अचूक योजना करण्यास उपयुक्त आहे.**